लोकमत



शिवाजी विद्यापीठात शनिवारी सद्भावना दिनानिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आदींनी प्रतिज्ञाग्रहण केले.

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिनानिमित्त सामूहिक प्रतिज्ञा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिनानिमित्त शनिवारी सामूहिक सद्भावना प्रतिज्ञाग्रहण करण्यात आले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त सद्भावना दिन साजरा केला. मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या उपक्रमावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये यांनी सद्भावना प्रतिज्ञेचे वाचन केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. आण्णासाहेब गुरव, अभिजीत रेडेकर, आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता एकच आवृत्ती

# नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची संधी

कोल्हापूर, ता.२०(प्रतिनिधी)–

**नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना केंद्र मानून त्याच्या आवडीला त्याच्या क्षमतांना व कौशल्यांना पुरेपुर वाव देण्यासाठी विविध सुविधांचा विचार करीत आहे.**

त्यादृष्टीने शैक्षणिक सुधारणा, नियमामध्ये शिथिलता व नवीन धोरणे राबवित आहे. याचाच एक भाग म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी अनेक कौशल्य संपादन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी पदविका आणि दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे.

आतापर्यत विद्यार्थ्यांना दोन पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण एकाच वेळी घेण्याची परवानगी नव्हती.पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते. मात्र आता एकाचवेळी दोन पूर्ण वेळ अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यामुळे एकाचवेळी दोन पदविका/पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा एक पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि पदवी असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध होतील.

पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल.विद्यापीठ अनुदान आयोगानुसार विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यावर असणार नाही.हा निर्णय डिप्लोमा,पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लागू आहे. हा निर्णय पीएचडी आणि एम.फिल.पदवी साठी लागू होणार नाही.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सामूहिक सद्भावना प्रतिज्ञा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ७८व्या जयंतीनिमित्त देशभरात सद्भावना दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात सकाळी सामूहिक सद्भावना प्रतिज्ञाग्रहण करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. अभय जायभाये यांनी सद्भावना प्रतिज्ञेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. आण्णासाहेब गुरव, संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिनानिमित्त प्रतिज्ञाग्रहण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह अधिकारीवर्ग. (छाया : पप्पू अत्तार)

पुढारी



# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षेला बारा हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांतर्गत शनिवारी ३१ विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १२ हजार ३६५ विद्यार्थी परीक्षेला बसले. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना १९ जूनपासून सुरुवात झाली आहे. शनिवारी बीएस्सी, बीए, एमबीए, एमए बीई, एमएस्सी, बी. फार्म., एमएसडब्ल्यू, एमआरएस, बीबीए आदी विषयांच्या परीक्षा झाल्या. दरम्यान, विद्यापीठातर्फे आजअखेर १३१ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# 'खेलो इंडिया'त पदक प्राप्त विद्यार्थ्यांचा होणार गौरव

कोल्हापूर : खेलो इंडिया स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी पदक मिळविल्यास त्यास पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत घेण्यात आला. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झाली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभाग, संगीत व नाट्यशास्त्र विभागातील कंत्राटी स्वरूपातील ११ महिन्यांच्या मुदतीची विविध पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : दै. पुढारी आयोजित 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स-२०२२' प्रदर्शनाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, दै. 'पुढारी'चे सरव्यवस्थापक (ऑपरेशन्स) राजेंद्र मांडवकर, कार्यकारी संपादक विजय जाधव, सौ. वर्षा बुगडे, नंदिनी खुपेरकर, योगेश सोनटक्के, प्रज्ज्वल बुगडे, बळीराम व्हराडे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# अडचणी समजून सुधारणा केल्यास पर्यटन व्यवसायास उज्ज्वल भविष्य

## कुलगुरू डॉ. शिर्के; दै. पुढारी 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स' प्रदर्शनास शानदार प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिडनंतर दोन वर्षांनी पहिल्यांदाच प्रत्येकजण मोकळा श्वास घेत आहे. भारत व परदेशात जाणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटन व्यवसायातील अडचणी लक्षात घेऊन सुधारणा करण्यास वाव आहे. 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स'कडे येणारा ग्राहक समाधानी राहिला, तरच पर्यटन क्षेत्राला उज्ज्वल भविष्य आहे. यातूनच रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

दै. पुढारी 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स-२०२२' प्रदर्शनाचे हॉटेल पॅव्हेलियनच्या मधुसुदन हॉलमध्ये शनिवारी शानदार उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिर्के बोलत होते. 'गगन टूर्स' प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक असून सहप्रायोजक 'अ हेवन हॉलीडेज' आहेत. याप्रसंगी दै. 'पुढारी'चे कार्यकारी संपादक विजय जाधव, दै. 'पुढारी'चे सरव्यवस्थापक (ऑपरेशन्स) राजेंद्र मांडवकर, 'गगन टूर्स'च्या श्रीमती नंदिनी खुपेरकर, 'अ हेवन हॉलीडेज'च्या सौ. वर्षा बुगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पर्यटन हे एक वेगळे क्षेत्र आहे. पर्यटन क्षेत्रात चांगली सेवा देणे हे प्रत्येक घटकाचे

दै. पुढारी 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स-२०२२'ला सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी प्रदर्शनाला गर्दी झाली. ट्रॅव्हल्स कंपन्यांनी जाहीर केलेल्या राज्य, देश-विदेशातील पर्यटनाच्या विविध सवलती आणि डिस्काऊंट ऑफरचा लाभ घेण्यासाठी स्टॉलला भेट देऊन ग्राहकांनी माहिती घेतली.




कर्तव्य आहे. खेड्यापाड्यातील ग्राहक महत्त्वाचा असून तो पर्यटनाकडे कसा आकर्षित होईल, हे पाहणे महत्त्वाचे आहे. पर्यटन क्षेत्रात मोठा बदल झाला आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ, आयसीटी ट्रेनिंग याचा वापर केला जात आहे. विमान नाईट लँडिंग, रेल्वे, रस्त्यांचे जाळे या प्रकारच्या सुविधांमुळे देश-विदेशात पर्यटनास खूप वाव आहे.

कोल्हापूरसह इतर ठिकाणी पर्यटनासाठी काय सुविधा देऊ शकतो, याचा विचार करावा लागणार आहे. पर्यटनास चालना देण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे ठरणार आहे, असेही ते म्हणाले.

कार्यकारी संपादक जाधव म्हणाले, कोरोनानंतर पर्यटनाचे विश्व खुले झाले आहे. जगातील पर्यटनाचा विचार करताना आपल्या येथे काय सेवा देऊ शकतो, याचा स्थानिक पातळीवर विचार व्हायला हवा. विविध सेवांचा विस्तार होत असताना शिवाजी विद्यापीठाने लोकाभिमुख पर्यटन होण्यासाठी पुढाकार घ्यावा. पर्यटनासंदर्भात सर्व्हे करून आराखडा तयार करावा. तो छोटे व्यावसायिक, हॉटेल मालक संघ, पर्यटनाशी संबंधित लोकांना द्यावा. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात काम करणे सोपे होईल.

यावेळी अ हेवन हॉलीडेजचे प्रज्ज्वल बुगडे, गगन टूर्सचे योगेश सोनटक्के, ट्रॅव्हल एजंट असोसिएशन ऑफ कोल्हापूरचे बळीराम व्हराडे, दै. 'पुढारी'चे विभागीय जाहिरात व्यवस्थापक शशिकांत पोवार, सिनिअर इव्हेंट मॅनेजर राहुल शिंगणापूरकर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना प्रतिज्ञा

कोल्हापूर : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिन साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये यांनी सद्भावना प्रतिज्ञेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. आण्णासाहेब गुरव, संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर आदी उपस्थित होते.

21 AUG 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : ख्यातनाम वास्तुविशारद आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठात दीपप्रज्वलन करताना ख्रिस्तोफर बेनिंजर. शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, प्रमोद बेरी, शिरीष बेरी, प्रदीप कुलकर्णी आदी.

# बेरी यांनी पिढ्या घडविल्या

## कुलगुरू डॉ. शिर्के; आर. एस. बेरी जन्मशताब्दी समारंभ

कोल्हापूर, ता. २० : "आर. एस. बेरी यांनी शिवाजी विद्यापीठाची इमारत बांधली. या इमारतीतच बेरी यांचा जन्मशताब्दी सोहळा होत आहे, याचा आनंद झाला. नाना म्हणजे चालते-बोलते विद्यापीठ होते. नानांनी बांधकाम क्षेत्रातील पिढ्या घडविल्या. नानांच्या जीवनावर जीवनचरित्र व्हावे. त्यांचे कार्य जागतिक स्तरावर पोहोचावे," असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

ख्यातनाम वास्तुविशारद, स्थापत्य अभियंता आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन इमारतीत कार्यक्रम झाला. आर्किटेक्ट बेनिंजर यांनी नानांनी लिहिलेल्या 'बेटर बिल्डिंग' या पुस्तकाचे कौतुक केले. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य करेन. नाना आणि बेरी कुटुंब नेहमी आमच्या संपर्कात आहेत, असे सांगितले.

आर्किटेक्ट प्रमोद बेरी यांनी स्वागत केले. आर्किटेक्ट शिरीष बेरी यांनी कुलगुरू डॉ. शिर्के, आर्किटेक्ट ख्रिस्तोफर बेनिंजर यांचे स्वागत केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर लोकल सेंटरचे प्रदीप कुलकर्णी यांनी अन्य पाहुण्यांचे स्वागत केले. आर्किटेक्ट बेनिंजर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांनी नाना बेरी यांच्या आठवणींबद्दल माहिती दिली. आर्किटेक्ट ॲण्ड इंजिनिअर्स असोसिएशन कोल्हापूरचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी सहभागी संस्थांच्या वतीने गेले सहा महिने या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा, कार्यक्रमांचा आढावा घेतला.

नाना बेरी यांच्या कन्या विनीता आग्गे, मुले शिरीष बेरी, प्रमोद बेरी, आर. के. जोशी, आनंद पाटील, प्रकाश देवलापूरकर, रवींद्र ओबेरॉय, ॲड. के. एस. कापसे यांनी नाना बेरी यांच्या आठवणींना उजाळा दिला. श्री. कोराणे यांनी आर्किटेक्ट बेनिंजर यांचा परिचय करून दिला. शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतील प्रा. महेश साळुंखे यांच्या हस्ते विविध स्पर्धांचा निकाल जाहीर झाला.

पदाधिकारी, देणगीदार, ज्युरींचे कौतुक केले. स्पर्धकांनी स्केचिंग, शॉर्ट फिल्म, इंटिरिअरचे प्रेझेंटेशन केले. डेक्कन इन्स्टिट्यूटमधील शैक्षणिक सल्लागार प्रमोद चौगुले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

21 AUG 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेरी यांनी बांधकाम क्षेत्रात अनेक पिढ्या घडवल्या

▪ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे उद्‌गार

प्रतिनिधी
कोल्हापूर

आर. एस. बेरी यांनी बांधकाम क्षेत्रातील अनेक पिढ्या घडवल्या आहेत, असे उद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. आर्किटेक्ट व इंजिनिअर आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाची शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनमध्ये सांगता झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमास पुणे स्थित ख्यातनाम अमेरिकन आर्किटेक्ट क्रिस्तोफर बेनिनझर यांची खास उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, बेरी यांनीच शिवाजी विद्यापीठीची इमारत बांधली आहे. याच इमारतीमध्ये बेरी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचा कार्यक्रम होत आहे. याचा आपल्याला आनंद आहे. त्यांच्या जीवनावर बायोग्राफी व्हावी व त्यांचे कार्य जागतिकस्तरावर पोहोचावे.



कोल्हापूर : आर्किटेक्ट आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या समारोपावेळी उपस्थित मान्यवर.

आर्किटेक्ट क्रिस्तोफर बेनिनझर यांनी, आर.एस. बेरी यांनी लिहिलेल्या बेटर बिल्डींग या पुस्तकाचे कौतुक करून, या पुस्तकाचे पुनर्मुद्रण व्हावे. यासाठी आपण आवश्यक ते सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमामध्ये बेरी परिवारातर्फे आर्कि. प्रमोद बेरी, शिरीष बेरी, विनिता आगे, आर. के. जोशी, आनंद पाटील, प्रकाश देवलापूरकर, रविंद्र ओबेरॉय, अॅड. के. ए. कापसे यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

कोल्हापूरमधील ख्यातनाम आर्किटेक्ट व इंजिनिअर आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शहरातील सर्व आर्किटेक्टस् व इंजिनिअर्स यांच्या सर्व शिखर संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस्, कोल्हापूर सेंटर, असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अँड इंजिनिअर्स, इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन इंटिरीअर डिझाइनर्स, कोल्हापूर चॅप्टर, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) कोल्हापूर सेंटर, डिपार्टमेंट ऑफ टेक्नोलॉजी, शिवाजी विद्यापीठ व डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी यांनी एकत्र येऊन हा जन्मशताब्दी कार्यक्रम साजरा केला.

यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस्, कोल्हापूर सेंटरचे चेअरमन आर्कि. विजय कोराणे व माजी चेअरमन आर्कि. सतीशराज जगदाळे, आर्किटेक्ट, इंजिनियर आदी उपस्थित होते.